महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्र शासन उपक्रम)
(CIN NO.U40109MH2005SGC153646)
कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, मंचर.
डी.एस.के. प्राईड, सर्व्हे क्रं.१७०/७ बी, पुणे-नाशिकरस्ता, ग्रामीण
आरोग्यकेंद्राजवळ, पो.मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे, पिनकोड-४१०५०३.
☎ - (का) ०२१३३-२२३०४०.
E-mail : ee61a0@mahatransco.in

पुण्यश्लोक 300

जा.क्र.काअ/अउदा संवसु विभाग/मंचर/मासं/ № 0147 दि. 10 FEB 2026

## जाहीर सुचना

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते कि, महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादित, अउदा संवसु विभाग,मंचर वर्ष २०२६-२७ करिता शिकाऊ उमेदवारांना एक वर्ष कालावधीसाठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून करारबध्द करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी www.apprenticeship.gov.in या संकेत स्थळावर शिकाऊ उमेदवारी करिता दिनांक ११.०२.२०२६ ते दिनांक २०.०२.२०२६ पर्यंत २३.५९ वाजेपर्यंत खालील नमुद आस्थापना नोंदनी क्रमांकवर ऑनलाईन अर्ज सादर करावे. आस्थापना नोंदणी क्रमांक व शिकाऊ उमेदवारी पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहेत:

| अनु.क्र | कार्यालयाचे नाव | रजिस्ट्रेशन क्रमांक | इलेक्ट्रिशियन/ विजतंत्री एकूण जागा |
|---|---|---|---|
| १ | अउदा संवसु विभाग,मंचर | E01212700050 | २५ |

१. शैक्षणिक अर्हता
   १. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण.
   २. राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन ०२ वर्षाचा इलेक्ट्रिशियन / विजतंत्री या व्यवसायात परिक्षा उत्तीर्ण.

२. शैक्षणिक दस्तावेज/कागदपत्रे (लागु असल्यामुळे)
   १. एस.एस.सी. व आय.टी.आय.(इलेक्ट्रिशियन / वीजतंत्री) सर्व सेमिस्टरचे उत्तीर्ण गुणपत्रिकाची मुळ प्रत.
   २. शाळा सोडल्याचा दाखला.
   ३. आधारकार्ड.
   ४. मागासवर्गीय असल्याचे जात प्रमाणपत्र.
   ५. महाराष्ट्र राज्याचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र.
   ६. प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे- नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या प्रवर्गातील उमेदवार वगळुन)
   ७. सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग (SEBC) असल्याबाबतचे प्रमाणपत्र.
   ८. आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) असल्याबाबतचे सध्याचे प्रमाणपत्र व इतर सर्व अनुषांगिक आवश्यक कागदपत्रांची मुळ प्रत उमेदवाराने स्वत:च्या प्रोफाईलवर स्कॅन करुन अपलोड करावे.

३. प्रशिक्षण कालावधीत कंपनी नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल.

४. नमुद पदसंख्या कमी-अधिक करण्याचे व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले निर्णय घेण्याचे सर्व अधिकार व्यवस्थापन राखुन ठेवित आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

५. भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने राजकिय किंवा इतर अधिका-याकडून दबाव आणल्यास त्या उमेदवारास भरती प्रक्रियेतुन बाहेर करण्यात येईल.

६. उमेदवाराने ऑनलाईन (Online) अर्ज करतांना पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्र स्कॅन योग्य रितीने करून अपलोड करणे बंधनकारक आहे. वरिल कालावधीत ऑनलाईन (Online) अर्ज सादर न केल्यास त्यानंतरच्या कालावधीत आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७. वयोमर्यादा १८ ते ३० वर्ष (मागास वर्गीयांसाठी ५ वर्ष शिथीलक्षम )

८. एस.एस.सी. व आय.टी.आय. इलेक्ट्रिशियन / विजतंत्री गुणपत्रिकेवरिल नाव आधारकार्ड मधील नावाशी सुसंगत असणे आवश्यक आहे अन्यथा आपला अर्ज स्विकारला जाणार नाही.

९. ऑनलाईन (Online) अर्ज सादर करताना उमेदवाराने सदयस्थितीत कार्यान्वयीत ई-मेल आय डी (Email ID) व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक राहील.

---२---



Mahabharti.in

१०. अपुर्ण, चुकीचे व अपु-या कागदपत्रांसह सादर केलेले ऑनलाईन अर्ज स्विकारले / विचारात घेतले जाणार नाही. अथवा त्याचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्जामध्ये नमुद केलेली माहिती खोटी अढळून आल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरेल.

११. शिकाऊ उमेदवारांची निवड ही एस.एस.सी. व आय.टी.आय.गुणांचा टक्केवारीनुसार तसेच सामाजिक आरक्षणाच्या अधिन राहून प्रवर्गनिहाय केली जाईल.

१२. आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारास या कार्यालयाने वेळोवेळी शासनाच्या नियमाप्रमाणे आरक्षणासंबंधित कागदपत्रांची मागणी केल्यास ते सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील

१३. प्रणाली मध्ये बदल होत असल्यामुळे या आधी ज्या उमेदवारानी वरिल रजिस्ट्रेशन क्रमांकावर (Online) अर्ज सादर केले असेल त्यांनी पुन्हा अर्ज सादर करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी. सदर भरती प्रक्रियेकरता दिनांक ११.०२.२०२६ ते दिनांक २०.०२.२०२६ पर्यंत २३.५९ वाजेपर्यंत दरम्यान (Online) अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचा विचार केला जाईल. वर नमुद दिनांकाच्या पुर्वी किंवा नंतर (Online) अर्ज सादर  केलेल्या उमेदवारांचा भरती प्रक्रियेकरिता विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१४. कामाचे ठिकाण:- अउदा संवसु विभाग, मंचर अंतर्गत २२० केव्ही उपकेंद्र, ब्रिजस्टोन(चाकण)/आळेफाटा/रांजणगांव/काठापूर/चाकण फेज-२/खेडसिटी तसेच १३२ केव्ही उपकेंद्र व्हर्लपूल(रांजणगांव)/एस.पी.एस.एल./पिंपळगांव/नारायणगांव/शिरुर/चाकण/सणसवाडी/कुरुळी/कवठे यमाई.

१५. निवड झालेल्या उमेदवारांना ई-मेल दवारे कळविण्यात येईल. तरी कोणीही महापारेषण कार्यालयास भेट देवु नये.

१६. सर्व अर्जदारांना कळविणेत येते की, दि.०५.०३.२०२६ रोजी सर्व मुळ कागदपत्रांसह व २ छायांकित प्रतिसह निवडीसाठी उपरोक्त कार्यालयीन पत्यावर ठिक सकाळी ११:०० वाजता उपस्थित रहावे.

१७. सदर प्रक्रियेमध्ये पुणे जिल्हयामधील उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

१८. प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने प्रशिक्षण कालावधीत कोणताही तंत्रनिकेतन किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयात पदविका/पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला नसावा.

१९. शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे महापारेषण कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

२०. निवड केलेल्या उमेदवारांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडून वैद्यकिय दृष्टया सक्षम असल्याचा दाखला देणे बंधनकारक आहे.

२१. शिकाऊ उमेदवारांस सदरील प्रकरणी येण्याचा व जाण्याचा कोणताही खर्च  अदा केला जाणार नाही.

कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग, मंचर

Mahabharti.in